सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## प्राधिकृत प्रकाशन

वर्ष १२ वे, राजपत्र क्र. ३७] गुरुवार ते बुधवार, सप्टेंबर १०-१६, २०२६ : भाद्रपद १९-२५, शके १९४८ [पृष्ठे - १५

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

# भाग एक–छत्रपती संभाजीनगर विभागीय पुरवणी

अनुक्रमणिका

| | पृष्ठे | | पृष्ठे |
|---|---|---|---|
| भाग एक-शासकीय अधिसूचना, नेमणुका, पदोन्नती, अनुपस्थितीची रजा (भाग एक-अ, चार-अ, चार-ब व चार-क यामध्ये प्रसिध्द करण्यात आलेले आहेत त्याच्याव्यतिरिक्त) केवळ छत्रपती संभाजीनगर विभागाशी संबंधित असलेले नियम व आदेश. | १५९५ ते १५९७ | भाग एक-अ (भाग चार-अ मध्ये प्रसिध्द करण्यात आले आहेत त्या व्यतिरिक्त) केवळ छत्रपती संभाजीनगर विभागाशी संबंधित असलेले महाराष्ट्र नगरपालिका, जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपंचायती, नगरपरिषदा, जिल्हा नगरपरिषदा, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम, या अन्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना. | ४३ ते ४५ |
| संकीर्ण अधिसूचना, नेमणुका, पदोन्नती इत्यादी केवळ छत्रपती संभाजीनगर विभागाशी संबंधित असलेले. | १५९७ ते १६०६ | | |

# शासकीय अधिसूचना, नेमणुका, पदोन्नती इत्यादी

**१**

**अवर सचिव, महाराष्ट्र शासन यांजकडून**

**महाराष्ट्र शासन**

**नगर विकास विभाग**

**मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,**

**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**दिनांक :- ०७/०७/२०२६**

**आदेश**

***महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ :-***

**क्रमांक टिपीएस - ३०२६/२४२/प्र.क्र.१११/२०२६/नवि -३० :-** ज्याअर्थी, सिडको, वाळूज महानगर क्षेत्राची विकास योजना, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ (सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ३७) (यापुढे "उक्त अधिनियम" असे संबोधले आहे) चे कलम ३१ अन्वये, नगर विकास विभागाची अधिसूचना क्र. टिपीएस-३०००/४४८४/प्र.क्र. २३५ (ए)/२०००/नवि-३०, दि. १४/०८/२००१ अन्वये भागशः मंजूर केली असून ती दि. ०१/१०/२००१ पासून अंमलात आली आहे. तसेच सिडको, वाळूज महानगर क्षेत्राची वगळलेल्या भागाची विकास योजना नगर विकास विभागाची अधिसूचना क्र. टिपीएस-३००१/१४९८/प्र.क्र.२५८(ए)/२००१/नवि-३०, दि.२३/०७/२००२ अन्वये भागशः मंजूर केली असून ती दि. १६/०९/२००२ पासून अंमलात आली आहे. (यापुढे "उक्त विकास योजना" असे संबोधले आहे);

आणि ज्याअर्थी, उक्त विकास योजनेमध्ये मौजे गोलवाडी येथील ग.क्र. ७७ (पै.) (यापुढे "उक्त जमीन" असा उल्लेख केला आहे.) येथील जमीन 'आरक्षण क्र. २/११४ - खेळाचे मैदान' (यापुढे "उक्त आरक्षण" असा उल्लेख केला आहे.) या प्रयोजनासाठी आरक्षित आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त आरक्षणांचे तत्कालिन समुचित प्राधिकरण सिडको, वाळूज महानगर, छत्रपती संभाजीनगर आहे. (यापुढे "उक्त समुचित प्राधिकरण" असा उल्लेख केला आहे.);

आणि ज्याअर्थी, उक्त समुचित प्राधिकरणाने उक्त जमीन, उक्त विकास योजना अंमलात आल्याच्या दिनांकापासून दहा वर्षाच्या कालावधीत संपादन केली नाही;

आणि ज्याअर्थी, उक्त जमिनीच्या मालकांनी, उक्त अधिनियमाचे कलम *१२७ (१)* नुसार नियोजन प्राधिकरण असलेल्या उक्त समुचित प्राधिकरणावर उक्त आरक्षणासंदर्भात उक्त अधिनियमाचे कलम १२७ *(१)* अन्वये दि. २२/०६/२०२२ रोजी सूचना बजावली आहे (यापुढे "उक्त सूचना" असा उल्लेख केलेला आहे.);

आणि ज्याअर्थी, उक्त सूचना बजावल्यानंतरही, उक्त समुचित प्राधिकरणाने, विहित कालावधीत उक्त जमीन संपादन केली नाही अथवा त्या संपादन करण्यासंबंधीची उक्त अधिनियमाचे कलम *१२६(४)* सह, भूसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ चे कलम १९ अन्वयेची भूसंपादनाची अधिसूचना विहित कालावधीत प्रसिध्द केली नाही;

आणि ज्याअर्थी, उक्त जमिनीच्या मालकांनी मा. मुंबई उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ येथे रिट याचिका क्र.१२४०८/२०२४ दाखल केली असून सदर प्रकरणी मा. उच्च न्यायालयाने दि.०५/०५/२०२५ रोजी आदेश पारीत केले आहेत;

आणि ज्याअर्थी, उक्त सूचना बजावल्यापासून, उक्त समुचित प्राधिकरणाने, विहित कालावधीत उक्त जमीन संपादन केली नाही अथवा उक्त जमीन संपादन करण्यासंबंधीची उक्त अधिनियमाचे कलम १२६ *(४)* सह, भूसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ चे कलम १९ अन्वयेची भूसंपादनाची अधिसूचना विहित कालावधीत प्रसिध्द केलेली नाही. त्यामुळे या परिस्थितीत उक्त अधिनियमाचे कलम १२७ *(१)* मधील तरतुदीनुसार उक्त जमिनीवरील उक्त आरक्षणे व्यपगत झाले असल्याचे शासनाचे मत झाले आहे;

आता त्याअर्थी, उक्त अधिनियमाचे कलम १२७ *(२)* नुसार प्राप्त अधिकारात राज्य शासन खालील परिशिष्टात नमुद केल्यानुसार, सिडको, वाळूज महानगर, छत्रपती संभाजीनगर विकास योजनेतील, मौजे गोलवाडी येथील ग.क्र. ७७ (पै.) या जागेवरील 'आरक्षण क्र. २/११४ - खेळाचे मैदान'(भागशः) हे आरक्षण खालील नमूद अटींच्या अधिन राहून, व्यपगत झाल्याचे अधिसूचित करीत आहे व अशाप्रकारे आरक्षणातून मुक्त झालेली जमीन या संबंधित जमीनमालकास उक्त विकास योजनेतील लगतच्या अनुज्ञेय भूवापराप्रमाणे अन्यथा अनुज्ञेय असलेल्या विकासाकरीता उपलब्ध होईल;

**अटी**

**अट क्र. १** - सुचनाकर्ते यांनी त्यांचे सुचनेंतर्गत जागेचा अद्ययावत व प्रमाणित मोजणी नकाशा सादर केलेला नसल्याने सदर आदेशामध्ये नमुद क्षेत्राबाबत भविष्यात कोणताही वाद अगर तक्रार उद्‌भवल्यास त्यास अर्जदार स्वतः जबाबदार राहतील.

**अट क्र. २** - सदरच्या आदेशाच्या अनुषंगाने भाग नकाशे अधिप्रमाणित करण्यापूर्वी संबंधित जमिन मालकांनी सुचनेखालील त्यांचे जागेचा भूमी अभिलेख विभागाकडील अद्ययावत व प्रमाणित मोजणी नकाशा संबंधित नियोजन प्राधिकरणास सादर करणे आवश्यक राहील.

**परिशिष्ट**

| अ.क्र. | गावाचे नांव, तालुका व जिल्हा | जमिनीचा सर्व्हे क्र./ गट क्र. | उक्त अधिनियमाचे कलम १२७ *(२)* अन्वये व्यपगत होणारे क्षेत्र | मंजूर विकास योजना मधील प्रस्ताव |
|---|---|---|---|---|
| १. | मौजे गोलवाडी ता. व जि. छत्रपती संभाजीनगर | ग.क्र. ७७ (पै.) | याचिकाकर्त्यांच्या मालकीचे बाधीत क्षेत्र | 'आरक्षण क्र. २/ ११४ - खेळाचे मैदान' (भागशः) |

प्रस्तुत आदेशान्वये उक्त आरक्षणामधून व्यपगत झालेले क्षेत्र दर्शविणाऱ्या भाग नकाशाची प्रत महानगर आयुक्त, छत्रपती संभाजीनगर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, छत्रपती संभाजीनगर यांच्या कार्यालयात कार्यालयीन वेळेत नागरिकांच्या अवलोकनार्थ एक महिन्याच्या कालावधीसाठी ठेवण्यात येईल.

सदरचे आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in (कायदे / नियम) या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे.

***महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,***

(प्रसाद रा. शिंदे)

**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

---

**BY UNDER SECRETARY TO GOVERNMENT**
**GOVERNMENT OF MAHARASHTRA**

Urban Development Department
Madam Kama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mantralaya, Mumbai 400 032.

**Dated : - 07/07/2026**

**ORDER**

***The Maharashtra Regional & Town Planning Act, 1966,***

**No. TPS - 3026/242/C.R.111/2026/UD - 30 :-** Whereas, the Development Plan of CIDCO,Waluj Mahanagar, Chhatrapati Sambhajinagar, has been partly sanctioned by the Government under section 31of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (Maharashtra Act No. XXXVII of 1966) ( hereinafter referred to as "the said Act") *vide* Notification No. TPS-3000/4484/CR-235 (A)/2000/UD-30, dt.14/08/200 l and has come into force with effect from dated the 01/10/2001and Excluded Part of Development Plan of CIDCO, Waluj Mahanagar, Chhatrapati Sambhajinagar, has been sanctioned by the Government under section 31 of the said Act *vide* Notification No. TPS-3001/1498/CR-258(A)/2001/ UD-30, dt. 23/07/2002 and has come into force with effect from dated the 16/09/2002 (hereinafter referred to as "the said Development Plan");

And whereas, in the said Development Plan, the land bearing Gut No.77 (Part) of Mauje Golwadi, Dist. Chhatrapati Sambhajinagar (hereinafter referred to as "the said Land") is reserved for "Site No.2/114 - Play Ground" (hereinafter referred to as " the said Reservation");

And whereas, the CIDCO, Waluj Mahanagar, Chhatrapati Sambhajinagar is erstwhile Appropriate Authority for the said Reservations. (hereinafter referred to as "the said Appropriate Authority")

And whereas, the said Land has not been acquired by the said Appropriate Authority within ten years from the date on which the said Development Plan came into force ;

And whereas, the Owners of the said land, in reference to the Said Reservations, had served a notice dated 22/06/2022 under section 127*(1)* of the said Act to the said Appropriate Authority, being the Planning Authority (hereinafter referred to as "the said Notice");

And whereas, even after service of the said Notice as aforesaid, the said Land had neither been acquired, within prescribed time period nor the Notification of land acquisition required under section 126 *(4)* of the said Act, read with Section 19 of the Right to Fair Compensation of Transparency in Land Acquisition, Rehabilitation & Resettlement Act, 2013, has been published by the said Appropriate Authority within prescribed time period from the date of the service of said Notices under sub-section *(1)* of section 127 of the said Act;

And whereas, the owners of the said Land have filed Writ Petition No. 12408/2024 before the Hon'ble Bombay High Court, Aurangabad Bench, and the final order is passed dated 05/05/2025 by the Hon'ble High Court;

And whereas, it is observed that, the said Land had neither been acquired, within prescribed time period from the date of service of Notice, nor Notification of land acquisition required under section 126 *(4)* of the said Act, read with section 19 of the Right to Fair Compensation of Transparency in Land Acquisition, Rehabilitation & Resettlement Act, 2013,

been published within prescribed time period by the said Appropriate Authority. And, in consequence thereof, the Government of Maharashtra is of opinion that, the said Reservations on the said Land stands lapsed as per the provisions of section 127 *(1)* of the said Act;

Now, therefore, in exercise of the powers conferred by sub-section *(2)* of section 127 of the said Act and of all other powers enabling it in that behalf, the Government of Maharashtra, as mentioned in the Annexure below, hereby notifies that, the said Reservation i.e. 'Site No.2/114 - Play Ground'(Partly), as specified in the Sanctioned Development Plan of CIDCO, Waluj Mahanagar, Chhatrapati Sambhajinagar, stands lapsed bearing, Gut No. 77 (Part) of Mauje Golwadi, Dist. Chhatrapati Sambhajinagar, subject to the following conditions and the area so released will be available to the owners for the purpose of development as otherwise permissible in the case of adjacent land under the said Development Plan.

**CONDITIONS**

***Condition No. 1-*** *Since the noticer have not submitted an recent and certified Mojani Sheet of the said land, the noticer themselves will be responsible for any dispute or complaint arising in the further regarding the area mentioned in the said order.*

***Condition No. 2-*** *Before authenticating the part plan in accordance with the said order, the concerned land owners will be required to submit a recent and certified Mojani Sheet of their proposed area from the Land Records Department to the concern Planning Authority.*

**ANNEXURE**

| Sr. No. | Name of the Village, Taluka and Dist. | Survey No./ Hissa No. | Area lapsed under section 127 (2) of the said Act | Reservation in sanctioned Development Plan |
|---|---|---|---|---|
| 1 | Mauje Golwadi, Dist. Chhatrapati Sambhaji-nagar, | Gut No. 77 (Part) | Area Affected owned by petitioners | 'Site No.2/114 - Play Ground' (Partly). |

A copy of the Part Plan, showing the area of the said Reservation which have been lapsed *vide* this Order, will be available in the office of the Metropolitan Commissioner, Chhatrapati Sambhajinagar Metropolitan Region Development Authority, Chhatrapati Sambhajinagar during office hours on all working days for inspection of public for the period of One month.

This Order shall also be published on the Govt. website www.maharashtra.gov.in (Acts / Rules).

***By order and in the name of the Governor of Maharashtra,***

(Prasad R. Shinde)
***Under Secretary to Government***

---

# संकीर्ण अधिसूचना, नेमणुका, पदोन्नती इत्यादी

२

**संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांजकडून**

**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ :-**

**जा. क्र. डि.टी.पी./वि.यो. कुंडलवाडी (सु.)/आ.क्र.३६ व आ.क्र.३७/ कलम-१२७(२)/आदेश/टिपीव्ही-५/२१९१ दि.२८/०४/२०२६.-** ज्याअर्थी, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ (सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ३७) (यापुढे **"उक्त अधिनियम"** असे संबोधिले आहे) चे कलम ३१ (१) चे तरतुदीनुसार कुंडलवाडी नगर परिषदेची सुधारित विकास योजना शासनाच्या नगर विकास विभागाकडील शासन अधिसूचना क्र. टिपीएस-३२०९/११७६/प्र.क्र.-२९८/२००९/नवि-३०, दि. ०३/०४/२०१२ रोजी मंजूर असून, (यापुढे **"उक्त अधिसूचना"** असे संबोधिले आहे) ती दि.१५/०५/२०१२ पासून अंमलात आलेली आहे. (यापुढे **"उक्त मंजूर विकास योजना"** असे संबोधिले आहे);

आणि ज्याअर्थी, उक्त मंजूर विकास योजनेनुसार, मौजे कुंडलवाडी, ता. बिलोली, जि. नांदेड येथील सि.स.क्र.१/१/ब या जमिनीमधील क्षेत्र आ. क्र. ३६ 'वाहनतळ' व आ.क्र. ३७ 'दुकान केंद्र' (यापुढे **"उक्त आरक्षणे"** असे संबोधिले आहे) या आरक्षणांनी बाधित होत आहे आणि उक्त आरक्षणांचे भूसंपादन व विकासासाठी समुचित प्राधिकरण नगर परिषद, कुंडलवाडी आहेत. (यापुढे **"उक्त समुचित प्राधिकरण"** असे संबोधिले आहे);

आणि ज्याअर्थी, उक्त आरक्षणांतर्गतच्या जमिनी उक्त समुचित प्राधिकरणाने उक्त मंजूर विकास योजना अंमलात आल्याच्या दिनांकापासून १० वर्षाच्या कालावधीत संपादित केल्या नाहीत;

आणि ज्याअर्थी, संबंधित जमीन मालकांनी (यापुढे **"उक्त जमीन मालक"** असे संबोधिले आहे) मौजे कुंडलवाडी येथील सि.स.क्रं. १/१/ब या क्षेत्रावरील (यापुढे **"उक्त जमीन "** असे संबोधिले आहे) उक्त आरक्षणासाठी उक्त अधिनियमाचे कलम १२७ (१) चे तरतुदीनुसारची दि. निरंक रोजीची सूचना उक्त समुचित प्राधिकरणावर बजावलेली असून (यापुढे **"उक्त सूचना"** असे संबोधिले आहे) ती उक्त समुचित प्राधिकरणास दि. १८/०७/२०२२ रोजी प्राप्त झाली आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त सूचना उक्त समुचित प्राधिकरणास प्राप्त झाल्याच्या दिनांकानंतर उक्त समुचित प्राधिकरणाने, २४ महिन्यांच्या विहित मुदतीत उक्त आरक्षणाखालील उक्त जमीन संपादित केलेली नाही अथवा उक्त जमिनीचे संपादन करण्यासंबंधी उक्त अधिनियमाच्या कलम १२७ (१) मधील तरतुदीनुसार आवश्यक ती उपाययोजना करण्यात आलेली नाही;

आणि ज्याअर्थी, मा. उच्च न्यायालय, मुंबई, औरंगाबाद खंडपीठात उक्त जमीन मालकांनी दाखल केलेल्या रिट याचिका क्र. १३२०१/२०२४ मध्ये मा. न्यायालयाने दि. २५/०९/२०२५ रोजीच्या आदेशान्वये (यापुढे **"उक्त आदेश"** असे संबोधिले आहे) संबंधित याचिकाकर्ते यांच्या मालकीचे सि.स.क्र.१/१/ब या जमिनीवरील उक्त आरक्षण व्यपगत ठरवून उक्त अधिनियमाचे कलम -१२७(२) चे तरतुदीनुसार अधिसूचना निर्गमित करणेबाबत निर्देश दिलेले आहेत ;

आणि ज्याअर्थी, मुख्याधिकारी, नगर परिषद, कुंडलवाडी यांनी दि.१७/१२/२०२५ रोजीच्या पत्र क्र. ३२९१, अन्वये सदर प्रकरणी उक्त अधिनियमाचे कलम १२७ (२) चे तरतुदीनुसार आदेश काढणेबाबत अहवाल सादर केलेला आहे;

आणि ज्याअर्थी, सहायक संचालक, नगर रचना, नांदेड शाखा कार्यालय, नांदेड यांनी पत्र क्र. २१७७, दि. ३०/१२/२०२५ अन्वये व सहसंचालक, नगर रचना, छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर यांनी पत्र क्र. १७०, दि. ०४/०२/२०२६ अन्वये उक्त अधिनियमाचे कलम-१२७ (२) चे तरतुदीन्वयेची अधिसूचना निर्गमित करणेबाबत अहवाल सादर केलेला आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त जमीनीवरील उक्त मंजूर विकास योजनेतील उक्त आरक्षणाबाबतची उपरोक्त नमूद वस्तुस्थिती पाहता, उक्त जमीनीवरील उक्त आरक्षण व्यपगत झाल्याबाबतचे आदेश उक्त अधिनियमाचे कलम १२७ (२) चे तरतुदीनुसार निर्गमित करणे आवश्यक आहे, असे संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे मत झाले आहे;

आणि ज्याअर्थी, शासनाच्या नगर विकास विभागाकडील निर्णय क्र. टिपीएस- १८१३/३२११/प्र.क्र.५०८/नवि-१३, दि. ०१/१२/२०१६ अन्वये सर्व नियोजन प्राधिकरण असलेल्या सर्व नगरपरिषदा/ नगर पंचायती आणि जिल्हा परिषद यांच्या विकास योजना संबंधाने, उक्त अधिनियमाचे कलम १२७ (२) चे तरतुदीनुसार कार्यवाही करण्याचे शासनाचे अधिकार उक्त अधिनियमाच्या कलम १५१ चे तरतुदीनुसार संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना प्रदान केलेले आहेत;

आता, त्याअर्थी, उक्त अधिनियमाचे कलम १२७ (२) चे तरतुदीनुसार संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य पुणे हे, या आदेशान्वये खालील परिशिष्टात नमूद केल्याप्रमाणे उक्त मंजूर विकास योजनेतील उक्त जमीनीवरील उक्त आरक्षण खालील नमूद अटींच्या अधिन राहून व्यपगत झाले आहे, असे अधिसूचित करीत आहेत आणि त्यासाठी उक्त मंजूर विकास योजनेच्या उक्त अधिसूचनेमध्ये पुढीलप्रमाणे सुधारणा करीत आहेतः-

उक्त मंजूर विकास योजनेच्या उक्त अधिसूचनेच्या बदलाच्या परिशिष्टामधील शेवटच्या नोंदीनंतर पुढील नविन नोंदीचा समावेश करण्यात येत आहे. :-

**अटी**

**अट क्र. १** - सदर आदेशामध्ये नमुद क्षेत्राबाबत भविष्यात कोणताही वाद अगर तक्रार उद्‌भवल्यास त्यास अर्जदार स्वतः जबाबदार राहतील.

**अट क्र. २** - सदरच्या आदेशाच्या अनुषंगाने भाग नकाशे अधिप्रमाणित करण्यापूर्वी संबंधित जमीन मालकांनी सूचनेखालील त्यांचे जागेचा भूमी अभिलेख विभागाकडील अद्ययावत मोजणी नकाशा संबंधित नियोजन प्राधिकरणास सादर करणे आवश्यक राहील.

**परिशिष्ट**

| अ.क्र. | नगर परिषद, मौजा, तालुका व जिल्हा | उक्त मंजूर विकास योजनेतील आरक्षण व वि. यो. अहवालानुसार अंदाजे क्षेत्र. | उक्त सूचनेखालील उक्त जमीनीचा तपशिल | उक्त आरक्षणातून व्यपगत झालेल्या भागाचे अंदाजे क्षेत्र |
|---|---|---|---|---|
| १ | नगर परिषद, कुंडलवाडी मौजे कुंडलवाडी, ता. बिलोली, जि. नांदेड. | आ. क्र. ३६‘वाहनतळ’ (३४०० चौ.मी.) | सि.स.क्र.१/१/ब | याचिकाकर्त्यांच्या मालकीचे आरक्षणांनी बाधित क्षेत्र |
| २ | | आ.क्र. ३७‘दुकान केंद्र’ (१२०० चौ.मी.) | | |

**टीप :-**

०१) उक्त आरक्षणामधून मुक्त झालेल्या उक्त जमीनी हया लगतच्या जमिनीवर उक्त मंजूर विकास योजनेनुसार अनुज्ञेय होणाऱ्या विकासाच्या प्रयोजनासाठी उक्त जमीनमालकांना उपलब्ध होईल.

०२) उक्त जमिनीचे उक्त आरक्षणातून व्यपगत झालेले क्षेत्र दर्शविणाऱ्या उक्त मंजूर विकास योजनेचा भाग नकाशा मुख्याधिकारी,नगरपरिषद, कुंडलवाडी, जि. नांदेड यांच्या कार्यालयात कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत नागरिकांच्या अवलोकनार्थ एक महिन्यापर्यंत खुला ठेवण्यात येत आहे.

०३) सदर आदेश संचालनालयाच्या **www.dtp.maharashtra.gov.in** या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे.

Digitally signed by
JITENDRA LAXMANRAO BHOPLE
Date 27/04/2026

**(जितेंद्र ल. भोपळे)**
संचालक, नगर रचना,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

## By Directorate of Town Planning Pune

## ORDER

**Maharashtra Regional & Town Planning Act, 1966.**

**No. D.T.P /D. P. Kundalwadi (R)/ Site No.36 and Site No.37 /Sec-127(2)/Order/TPV-V/2191 Dt. 28/4/2026 : -** Whereas, the Development Plan of Kundalwadi Municipal Council, (Revised) has been sanctioned as per the provisions of section 31(1) of the Maharashtra Regional & Town Planning Act, 1966 (Maharashtra Act No. XXXVII of 1966 ) (hereinafter referred to as **"the said Act"**) by the Government of Maharashtra in Urban Development Department *vide* Notification No. TPS-3209/1176/C.R.-298)/2009/UD-30, dated 03/04/2012 ( hereinafter referred to as **" the said Sanctioned Development Plan"**) and the same has come into force with effect from 15/05/2012 ( hereinafter referred to as **" the said Notification"**);

And whereas, as per the said sanctioned Development Plan, area of the land bearig C.S.No 1/1/B of Mouje Kundalwadi, Tal. Biloli, Dist. Nanded is affected by Reservation Site No.36 - 'Parking' and Reservation Site No.37 'Shopping Centre' ( hereinafter referred to as **" the said Reservations"**) and the Appropriate Authority for acquisition and development of the said Reservations is Municipal Council, Kundalwadi (hereinafter referred to as "the said Appropriate Authority");

And whereas, the Land under the said Reservation has not been acquired by the said Appropriate Authority within 10 (Ten) years from the date on which the said sanctioned Development Plan come into force ;

And whereas, the concerned land owner ( hereinafter referred to as **"the said Land Owners")** of the land bearing C. S. No.1/1/B ( hereinafter referred to as **"the said Lands")** had served a notice for the said Reservation on the said Lands as per the provisions of section 127 (1) of the said Act dated Nill (hereinafter referred to as **"the said Notice"**) on the said Appropriate Authority which was received by the said Appropriate Authority on 18/07/2022;

And whereas, the said Lands under the said Reservation are not acquired or no steps as required as per the provisions of section 127 (1) of the said Act have been taken by the said Appropriate Authority, within a stipulated period of 24 months after receipt of the said Notice ;

And whereas, in the Writ Petition No. 13201/2024 filed by the said Land Owners in the Hon'ble High Court, Mumbai, Aurangabad Bench, the Hon'ble Court has passed on order dated 25/09/2025 (hereinafter referred to as **"the said Order"**) stating that, the said Reservation on land of the Petitioners out of C.S.No.1/1/B for the said Reservations stands lapsed. The Respondents shall take steps for issuance of notification under sub section 2 of section 127 of the said Act;

And whereas, the Chief Officer, Municipal Council, Kundalwadi *vide* letter No. 3291, dt. 17/12/2025 has submitted a report stating that, it would be appropriate to publish the order under the provisions of Section 127 (2) of the said Act;

And whereas, the Assistant Director of Town Planning, Nanded Branch Office, Nanded *vide* letter No. 2177, dt.30/12/2025 and the Joint Director of Town Planning,` Chhatrapati Sambhajinagar Division, Chhatrapati Sambhajinagar *vide* letter No.170, dt. 04/02/2026 have submitted reports for issuance of notification as per the provisions of section 127 (2) of the said Act;

And whereas, after considering the above facts in respect of the said Reservation on the said Lands in the said sanctioned Development Plan, the Director of Town Planning, Maharashtra State, Pune is of the opinion that, it is necessary to issue the order as per the provisions of section 127 (2) of the said Act, regarding the lapsing of the said Reservation on the said Land;

And whereas, the Government in Urban Development Department as per the provisions of section 151 of the said Act, *vide* Resolution No. TPS-1813/3211/C.R.-508/UD-13, dated 01/12/2016 has delegated the powers exercisable by it as per the provisions of section 127 (2) of the said Act in respect of Development Plans of all Municipal Councils / Nagar Panchayat / Zilla Parishad as a Planning Authority to the Director of Town Planning Maharashtra State, Pune;

Now, therefore, the Director of Town Planning, Maharashtra State, Pune by this order and as mentioned in the Schedule hereinafter hereby notifies the lapsing of the said Reservation subject to the following conditions in respect of the said lands as per the provisions of section 127 (2) of the said Act and for that purpose amends the said Notification of the said sanctioned Development Plan, as follows :-

After the last entry in the Schedule of Modifications accompanying the said Notification of the said sanctioned Development Plan, the following new entry shall be added :-

**CONDITIONS**

Condition No. 1 - The noticer themselves will be responsible for any dispute or complaint arising in the future regarding the area mentioned in the said order.

Condition No. 2 - Before authenticating the part plan in accordance with the said order, the concerned land owners will be required to submit a recent Mojani Sheet of their proposed area from the Land Records Department to the concern Planning Authority.

**SCHEDULE**

| Sr. No. | Municipal Council, Mouje, Tal., Dist. | Reservation of the said sanctioned Development Plan & its Approximate Area as per D.P. Report | Description of the said Lands under the said Notice | Approximate Area lapsed from the said Reservation |
|---|---|---|---|---|
| 1 | Kundalwadi Municipal Council, Mouje Kundalwadi, Tal. Biloli, Dist. Nanded | Site No. 36 - "Parking" (3400 Sq.mtr.) | C.S.No.1/ 1/B | Reservation affected area owned by the Petitioner |
| | | Site No. 37 - "Shopping Centre" (1200 Sq.mtr.) | | |

**Note:-**

1) The said Lands so released from the said Reservation shall become available to the said Land Owners for the purpose of development as otherwise permissible in the case of adjacent land under the said sanctioned Development Plan.

2) A copy of the part plan of the said sanctioned Development Plan showing the area of the said Land which is lapsed from the said Reservation, is available in the office of the Chief Officer. Municipal Council, Kundalwadi, Tal. Biloli, Dist. Nanded during office hours on all working days for inspection to public up to one month.

3) The said order is being published on the website of the Directorate **www.dtp.maharashtra.gov.in**

Digitally signed hy
JITENDRA LAXMANRAO BHOPLE
Date 27/04/2026

**(Jitendra L. Bhople)**
Director of Town Planning,
Maharashtra State, Pune.

----------------------

३

**पोलीस आयुक्त, छत्रपती संभाजीनगर यांजकडून**
**महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) व (३) अन्वये**
**आदेश**

**आदेश :-**

**जा.क्र.विशा-५/आदेश/-२०२६/२७११ :-** ज्या अर्थी माझे असे निदर्शनास आणुन देण्यात आले आहे की, छत्रपती संभाजीनगर पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रामध्ये आगामी काळात सण, उत्सव साजरे करण्यात येणार असुन तसेच विविध राजकीय पक्ष व संघटनातर्फे त्यांच्या निरनिरळया मागण्यांचा तसेच इतर विषया संदर्भात खालील नमुद प्रमाणे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले आहे.

दिनांक ११/०८/२०२६ रोजी संत सावता माळी पुण्यतिथी आहे.

दिनांक १३/०८/२०२६ रोजी श्रावण मासारंभ व अहिल्याबाई होळकर पुण्यतिथी आहे.

दिनांक १४/०८/२०२६ रोजी पतेती सन आहे.

दिनांक १५/०८/२०२६ रोजी स्वातंत्र्य दिन आहे.

विविध राजकीय पक्ष/संघटना यांचेकडून त्यांचे विविध मागण्या संदर्भात धरणे, मोर्चे व निदर्शने इत्यादी आंदोलनात्मक कार्यक्रम घेण्याची शक्यता आहे.

औद्यौगिक तसेच इतर संघटीत/असंघटीत कामगार संघटनाकडून त्यांच्या विविध मागण्या संदर्भात आंदोलनात्मक कार्यक्रम घेण्याची शक्यता आहे.

छत्रपती संभाजीनगर शहर हे संवेदनशील असल्याने कायदा व सुव्यवस्था तसेच सार्वजनिक शांतता अबाधीत राहावी म्हणून महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) व (३) अन्वये प्रतिबंधात्मक आदेश लागु करणे जरुरीचे वाटते.

वरील कारणामुळे कोणताही अनुचित प्रकार घडु नये आणि सार्वजनिक शांतता, कायदा व सुव्यवस्था अबाधित राहीवी यासाठी, महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) व (३) अन्वये मला प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करुन **मी प्रविण पवार, पोलीस आयुक्त छत्रपती संभाजीनगर** असे आदेशीत करीत आहे की, छत्रपती संभाजीनगर पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रात शासकीय कर्तव्य पार पाडणाऱ्या व्यक्ती व्यतिरिक्त अन्य कोणत्याही ठिकाणी अथवा त्याचे जवळपास कोणत्याही व्यक्तीस -

(अ) शस्त्रे, सोटा, तलवार, भाले, दंडे, बंदुका, सुरे, काठया किंवा लाठया, किंवा धार्मिक सण, उत्सव, मिरवणुक, मोर्चा, निदर्शने, आंदोलनात लोखंडी, स्टीलचे धातूने बनवलेले पाईप अथवा दुचाकी सायलन्सर चा वापर करुन गावठी पध्दतीने (सुतळी बॉम्ब) फोडण्यासाठी बंदुक तयार करुन ती सार्वजनिक ठिकाणी वापरली असता मानवास व पशुपक्षी यांना गंभीर इजा होवु शकते. असा प्रकारचे लोखंडी, स्टीलचे धातुने बनवलेले पाईप अथवा दुचाकीचे सायलन्सर चा वापर करुन गावठी पध्दतीने (सुतली बॉम्ब) फोडण्याची बंदुक वापरण्यास या आदेशाद्वारे मनाई करण्यात येत आहे. तसेच शारिरीक इजा करण्यासाठी वापरला जाऊ शकेल अशी इतर कोणतीही वस्तू जवळ बाळगता येणार नाही. तयार करता येणार तसेच वापरता येणार नाही.

(ब) कोणताही दाहक पदार्थ किंवा स्फोटक पदार्थ सोबत बाळगता येणार नाही.

(क) दगड किंवा इतर क्षेपणास्त्रे सोडावयाची किंवा फेकावयाची साधने बाळगू नये, जमा करु नये किंवा तयार करता येणार नाही.

(ड) कोणत्याही व्यक्तिची प्रतिमा अथवा प्रेते किंवा आकृत्या यांचे प्रदर्शन करता येणार नाही

(इ) जाहीरपणे घोषणा करु नये, गाणे किंवा त्यांचे ध्वनिमुळे सार्वजनिक शांतता भंग होणार नाही असे ध्वनिक्षेपण करु नये.

(फ) अशा प्राधिकाऱ्यांच्या मते ज्यामुळे सभ्यता अगर नितिमत्ता यास धक्का पोहचेल अशी किंवा राज्याची सुरक्षितता धोक्यात येईल किंवा ज्यामध्ये राज्य उलथवून टाकण्याची प्रवृत्ती दिसून येत असेल अशी आवेश पुर्ण भाषणे करु नये, सोंग अरग हावभाव करु नये, आणि अशी चित्रे, चिन्हे, फलक किंवा इतर कोणतीही जिन्नस किंवा वस्तू तयार करु नये, त्याचे प्रदर्शन करु नये किंवा त्यांचा जनतेस प्रसार करता येणार नाही.

तसेच आणखी असेही आदेशीत करीत आहे की, संपूर्ण छत्रपती संभाजीनगर पोलीस आयुक्तालय हद्दीत पाच किंवा पाच पेक्षा अधिक व्यक्तींना सार्वजनिक ठिकाणी एकत्र जमण्यास, निदर्शने, धरणे, मोर्चा, मिरवणुक काढण्यास मनाई करण्याचा आदेश देत आहे. हा आदेश अत्यंविधी, विवाह समारंभ आणि कर्तव्यावरील कोणतेही पोलीस अधिकारी/अंमलदार किंवा शासकीय कर्मचारी तसेच पोलीस उप आयुक्त, सहाय्यक पोलीस आयुक्त, आणि पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांनी दिलेल्या परवानगी नुसार घेतलेल्या कार्यक्रमांना हा आदेश लागु होणार नाही.

सदरचा आदेश छत्रपती संभाजीनगर, **पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रात दिनांक ०२/०८/२०२६ चे ००.०१ वाजपासून ते दिनांक १६/०८/२०२६ चे २४.०० वाजे पावेतो लागू राहील.**

सदर आदेशाचे उल्लघंन केल्यास उल्लंघन करणारी व्यक्ती महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम १३५ अन्वये कारवाईस पात्र राहील.

सदर आदेशाची अंमलबजावणी करण्यासाठी आम्ही आमचे अधिनस्थ परिमंडळाचे सर्व पोलीस उप-आयुक्त, विभागाचे सहाय्यक पोलीस आयुक्त, पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी तसेच सर्व शाखा प्रभारी अधिकारी यांना प्राधिकृत करीत आहोत.

मी पुढे असेही नमुद करतो की, सदरच्या आदेशाची नोंद ही कार्यालयीन राजपत्रात समाविष्ट करण्यात येईल किंवा छत्रपती संभाजीनगर, पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रातील दर्शनीय ठिकाणी चिटकावून ध्वनिक्षेपकाद्वारे जाहीर करण्यात येईल.

सदरचा आदेश हा माझ्या सही शिक्यानिशी आज दिनांक ३१/०७/२०२६ रोजी काढण्यात आला आहे.

ठिकाण - छत्रपती संभाजीनगर
दि. ३१/०७/२०२६

**(प्रविण पवार) भा.पो.से.**
पोलीस आयुक्त, छत्रपती संभाजीनगर

---

## ४

## उपविभागीय अधिकारी तथा भुसपांदन अधिकारी, पैठण-फुलंब्री मुख्यालय - छत्रपती संभाजीनगर यांजकडून

## अधिसुचना

## भुसंपादनातील योग्य नुकसान भरपाईचा अधिकार व स्थानांतरण, पुनःस्थापना आणि पुनर्वसन अधिनियम २०१३

**क्र.२०२६/उपविअ/पैफु/भूसं/वाकोद म.प्र.पाल/कान्होरी/सिआर-१८५/कावी-** .– मा. जिल्हाधिकारी छत्रपती संभाजीनगर यांचे आदेश क्र.२०२६/आरबीडेक्स-४/भुसंपादन/ समन्वय/ सीआर ९३ दिनांक ०३.०७.२०२६ ज्याअर्थी,भूसंपादन पुनर्वसन, पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३ (२०१३ चा ३०) याच्या कलम ३ खंड (इ) च्या परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन काढण्यात आलेल्या शासकीय अधिसुचना महसूल व वन विभाग क्र. संकिर्ण -११/२०१४/प्र.क्र.७७/अ-२, दि. १९ जानेवारी २०१५ (यात यापुढे जिचा निर्देश “उक्त अधिसूचना” असा करण्यात आला आहे) याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (झेड -अे) मध्ये व्याख्या केलेल्या एखाद्या सार्वजनिक प्रयोजनासाठी एखाद्या जिल्ह्यातील ५०० हेक्टर पेक्षा अधिक नसेल इतक्या क्षेत्राकरिता जमीन संपादन करण्याच्या संबंधात अशा जिल्ह्याचा जिल्हाधिकारी हा उक्त अधिनियामाच्या प्रयोजनासाठी समूचित शासन असल्याचे मानण्यात येईल.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमांच्या कलम-३ च्या खंड (छ) अन्वये, समुचित शासन असलेल्या जिल्हाधिकारी यांनी उक्त अधिनियामाखाली जिल्हाधिकाऱ्यांची कार्ये पार पाडण्यासाठी **निलम बाफना**, उप विभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी पैठण-फुलंब्री (अधिसूचना काढण्यापूर्वी येथे अधिकाऱ्याचे नाव व पत्ता नमूद करावा) यास पदनिर्देशित केले आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिसूचनेनुसार समुचित शासन असलेल्या, छत्रपती संभाजीनगर जिल्हयाच्या जिल्हाधिकाऱ्यास यासोबत जोडलेल्या अनुसूची एक मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेली जमीन (यात यापुढे जिचा निर्देश उक्त “उक्त जमीन” असा करण्यात आला आहे.) सार्वजनिक प्रयोजनासाठी (यात यापुढे ज्याचा निर्देश उक्त “सार्वजनिक प्रयोजन” असा करण्यात आला आहे) आवश्यक आहे अथवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे असे वाटते, ज्याच्या स्वरुपाचे विवरण यासोबत जोडलेल्या अनुसूची दोन मध्ये दिलेले आहे, आणि म्हणून उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट कलम (१) च्या तरतुदीन्वये याद्वारे असे अधिसूचित करण्यात येते की, उक्त जमिनीची उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता भासण्याची शक्यता आहे.

आणि ज्याअर्थी, प्रस्तावित भूमिसंपादनाच्या अनुषंगाने बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे यासोबत जोडलेल्या अनुसूची तीन मध्ये दिलेली आहेत.

आणि ज्याअर्थी, सामाजिक परिणाम निर्धारण सारांश यासोबत जोडलेल्या अनुसूची चार मध्ये दिलेला आहे

आणि ज्याअर्थी कलम ४३ च्या पोट कलम (१) अन्वये पुर्नवसन व पुर्नवसाहत या प्रयोजनासाठी नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील, यासोबत जोडलेल्या अनुसूची पाचमध्ये दिलेला आहे.

त्याअर्थी आता, असे घोषित करण्यात येते की, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट कलम ४ अनुसार कोणतीही व्यक्ती ही अधिसूचना प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासुन ते उक्त अधिनियमांच्या प्रकरण चार खालील कार्यवाही पूर्ण होईल त्या कालावधी पर्यंत उक्त जमिनीचा अथवा तिच्या भागाचा कोणताही व्यवहार करणार नाही किंवा उक्त जमिनीवर कोणताही भार निर्माण करणार नाही.

परंतू उक्त जमिनीच्या अथवा तिच्या भागाच्या मालकाने अर्ज केल्यावर, जिल्हाधिकाऱ्यास विशेष परिस्थितीची कारणे लेखी नमूद करुन अशा मालकास उपरोक्त तरतुदीच्या प्रवर्तनातून सुट देता येईल.

परंतू आणखी असे की, जर कोणत्याही व्यक्तीने या तुरतुदीचे बुध्दीपुरस्पर उल्लंघन केल्यामुळे तिला झालेल्या कोणत्याही हानीची किंवा क्षतीची जिल्हाधिकाऱ्यांकडून भरपाई दिली जाणार नाही.

तसेच, उक्त अधिनियामांच्या कलम ११ च्या पोट कलम (५) अनुसार, जिल्हाधिकारी भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम २०१४ (यात यापुढे ज्यांचा निर्देश "उक्त नियम" असा करण्यात आला आहे.) यांच्या नियम १० च्या उप नियम (३) द्वारे विहित केल्याप्रमाणे भूमिअभिलेखाच्या अद्ययावतीकरणाचे काम हाती घेणार असल्याचे व पूर्ण करणार असल्याचे देखील घोषित करण्यात येत आहे.

## अनुसूची - एक

## जमिनीचे वर्णन

**गाव :** पाल व कान्होरी **तालुका** : फुलंब्री **जिल्हा** : छत्रपती संभाजीनगर

| अ.क्र. | गट क्रमांक | अंदाजीत क्षेत्र (हेक्टर) |
|---|---|---|
| | **मौजे पाल ता. फुलंब्री** | |
| १ | ३६१ पै. | ००.१५ |
| २ | ३६१ पै. | ००.०५ |
| ३ | ३३६ पै. | ००.०३ |
| ४. | ३३६ पै. | ००.१२ |
| ५. | ३२७ पै. | ००.०१ |
| ६. | १९१ पै. | ००.०१ |
| ७. | १९१ पै. | ००.०५ |
| | **एकुण** | **००.४२** |
| | **मौजे कान्होरी ता. फुलंब्री** | |
| ८ | ३२७ पै. | ००.०७ |
| ९ | ३२७ पै. | ००.०५ |
| १० | ३१७ पै. | ००.०७ |
| ११ | ३१७ पै. | ००.२३ |
| १२ | ३२९ पै. | ००.१४ |
| १३ | ३२९ पै. | ००.०८ |
| १४ | ३२९ पै. | ००.१० |
| १५ | ३२९ पै. | ००.१६ |
| १६ | ३४४ पै. | ००.०७ |
| १७ | ३४४ पै. | ००.०७ |
| १८ | ३४४ पै. | ००.०६ |
| १९ | ३४४ पै. | ००.१८ |
| २० | ३४४ पै. | ००.१८ |
| २१ | ३४४ पै. | ००.१६ |
| २२ | ५८ पै. | ००.०१ |
| २३ | २१२ पै. | ००.०९ |
| २४ | २१२ पै. | ००.११ |
| २५ | २१२ पै. | ००.१४ |
| २६ | २१६ पै. | ००.०२ |
| २७ | २१३ पै. | ००.०८ |
| २८ | २१३ पै. | ००.०४ |
| २९ | २१४ पै. | ००.०२ |
| ३० | २१४ पै. | ००.०४ |
| ३१ | २१४ पै. | ००.०३ |
| ३२ | २१५ पै. | ००.०१ |
| ३३ | २०० पै. | ००.०१ |
| ३४ | २०० पै. | ००.०६ |
| ३५ | १९९ पै. | ००.०७ |
| ३६ | १९९ पै. | ००.०७ |
| ३७ | १९८ पै. | ००.०२ |
| ३८ | १९८ पै. | ००.०९ |
| ३९ | २०० पै. | ००.०६ |
| ४० | २०० पै. | ०.०२ |
| | **एकुण** | **२.६१** |

मौजे पाल ०.४२ + मौजे कान्होरी २.६१ = एकुण संपादनाखाली क्षेत्र ०३ हे. ०३ आर.

## अनुसूची - दोन

## सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरुपाबाबत विवरण

**प्रकल्पाचे नाव :** वाकोद मध्यम प्रकल्प अंतर्गत गिरीजा वाकोद जोड कालव्याच्या (बंद नलीकेद्वारे) कामा करीता मौजे पाल व कान्होरी, ता. फुलंब्री, जि. छत्रपती संभाजीनगर.

**प्रकल्पकार्याचे वर्णन :** वाकोद मध्यम प्रकल्प अंतर्गत गिरीजा वाकोद जोड कालव्याच्या (बंद नलीकेद्वारे) कामा करीता मौजे पाल व कान्होरी, ता. फुलंब्री, जि. छत्रपती संभाजीनगर.

**समाजाला मिळणारे लाभ :** पाणी साठवण व पाणी पुरवठा

**अनुसूची - तीन**

बाधित व्यक्तीचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे - विस्थापनाची आवश्यकता नाही. सबब माहिती निरंक.

**अनुसूची - चार**

सामाजिक प्रभाव निर्धारणाची सारांश - महाराष्ट्र शासन राजपत्र दिनांक १३/०३/२०१५ व २६/०४/२०१८ अनुसार उक्त अधिनियमाचे प्रकरण २ व ३ मधील तरतुदी लागु करण्यापासून सुट प्राप्त.

**अनुसूची - पाच**

**नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील**

अ. प्रशासक म्हणून नियुक्त करण्यात आलेल्या अधिकाऱ्याचे पदनाम -

ब. प्रशासकाच्या कार्यालयाचा पत्ता -

क. ज्या अधिसूचनेद्वारे प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली आहे त्या अधिसूचनेचा तपशील.

टीप :- उक्त जमिनीच्या आराखड्याचे उप विभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी पैठण - फुलंब्री यांच्या कार्यालयामध्ये निरीक्षण करता येईल.

दिनांक : ०५/०८/२०२६

ठिकाणः छत्रपती संभाजीनगर

**(निलम बाफना)**
उप विभागीय अधिकारी तथा
भुसंपादन अधिकारी, पैठण-फुलंब्री .

---

**५**

**उपविभागीय अधिकारी परतूर जि.जालना यांजकडून**

**भूमीसंपादन पुनर्वसन व पुर्नस्थापना करतांना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३ चे कलम १९ (१) खालील अधिसुचना :**

**जा.क्र.२०२६/भूसंपादन/सीआर-३२/२३, दि. ११.०८.२०२६** .— ज्याअर्थी,समुचित शासन असलेल्या जालना जिल्हयाच्या जिल्हाधिकारी यांनी भूसंपादन, पुनर्वसन, पुनर्वसाहत करतांना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३ (२०१३ चा ३० ) यात यापुढे ज्याचा निर्देश उक्त अधिनियम असा केला आहे. याच्या कलम ११ च्या पोट कलम (१) व्दारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन अधिसुचना क्रमांक २०२६/ भूसंपादन/सिआर/३२/२३ दिनांक ०७.०८.२०२५ अन्वये प्रारंभीक अधिसूचना काढलेली आहे आणि त्याव्दारे अधिसुचित केले आहे की, यासोबत जोडलेल्या अनुसूचि १ मध्ये अधिक तपशिलवार वर्णन केलेल्या जमीनीची अनुसुचि २ मध्ये अधिक तपशिलवार विर्निदिष्ट केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे किंवा आवश्यक भासण्याची शक्यता आहे.

आणि ज्याअर्थी ,जालना जिल्हयाच्या जिल्हाधिकारी यांनी कलम १५ च्या पोट कलम २ अन्वये दिलेला अहवाल कोणताही असल्यास विचारात घेतल्यानंतर उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमीन संपादीत करण्याची आवश्यकता आहे. या बाबत त्यांची खात्री पटली आहे आणि म्हणुन उक्त अधिनियमाच्या कलम १९ च्या पोट कलम (१) च्या तरतुदी अन्वये उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमीनीची आवश्यकता आहे असे याव्दारे घोषित करण्यात येते.

आणि ज्याअर्थी,अनुसूचि ३ मध्ये अधिक तपशिल वार वर्णन केलेले क्षेत्र हे बाधीत कुटूंबाच्या पुनर्वसन,पुर्नवसाहतीच्या प्रयोजनासाठी पुनर्वसाहत क्षेत्र म्हणुन निर्धारीत केले असल्याचे याव्दारे घोषित केले असून पुनर्वसन व पुर्नवसाहत योजनेचा सारांश अनुसूचि ४ मध्ये विर्निदिष्ट केला आहे.

आणि ज्याअर्थी,उक्त अधिनियमाच्या ३ च्या खंड (छ) अन्वये समुचित शासन असलेले जिल्हाधिकारी उक्त अधिनियमान्वये जिल्हाधिकारी यांची कार्ये पार पाडण्यासाठी उपविभागीय अधिकारी परतूर जि.जालना यांना पदनिर्देशित करीत आहे.

**अनुसुचि एक**

**संपादीत करावयाच्या जमीनीचे वर्णन**

गावाचे नाव : सातोना खु. ता. परतुर जि.जालना

प्रकल्पाचे नाव :- निम्न दुधना प्रकल्पासाठी

**मौजे सतोना खु. ता. परतूर निम्न दुधना प्रकल्पा करीता अतिरिक्त भुसंपादन.**

| **अ.क्र.** | **गट क्रमांक** | **मौजे सतोना खु. ता. परतूर येथील संपादीत क्षेत्र हे. आर** |
|---|---|---|
| १ | १२६ | १.८२ |
| | | **१.८२** |

**अनुसुचि दोन**

**सार्वजनिक प्रयोजनाचे स्वरुप बाबत वर्णन**

**प्रकल्पाचे नाव :** निम्न दुधना प्रकल्प

**प्रकल्पाच्या कामाचे वर्णन :** मौजे सातोना खु.ता.परतुर जि. जालना येथील निम्न दुधना प्रकल्पातील नव्याने भुसंपादन वरील प्रमाणे गट क्र. १२६ मधून एकूण क्षेत्र ०१ हे ८२ आर जमीन संपादीत करणे बाबत.

**समाजास होणारे लाभ :** मौजे सातोना खु. ता. परतुर येथील गट क्रमांक १२६ मधून एकूण १ हे ८२ आर जमीन निम्न दूधना प्रकल्पाचे बुडीत क्षेत्रा करीता संपादन करण्यात आल्याने जमीनीतील पाण्याची पातळी वाढेल. (आर्थीक रोजगार, पायाभुत सुविधा, इतर लाभा संबंधात)

**अनुसुचि तीन**

**पुर्नवसाहत क्षेत्राबातचे वर्णन**

| | | |
|---|---|---|
| गावाचे नाव | : | निरंक |
| तालुका | : | निरंक |
| जिल्हा | : | निरंक |

**अनुसुचि चार**

**पुर्नवसन व पुर्नवसाहत योजनेचा सारांश**

**निरंक**

**टीप :- उक्त जमीनीच्या नकाशाचे वर्णन :-** उक्त जमीनीचे नकाशे उपविभागीय अधिकारी कार्यालय परतूर जि. जालना यांच्या कार्यालयात निरिक्षणा करीता ठेवले आहे.

ठिकाण :- परतूर

दिनांक :- /०८/२०२६

**पद्माकर गायकवाड**
उपविभागीय अधिकारी
परतूर जि.जालना.

---

**६**

**जिल्हाधिकारी, नांदेड यांजकडून**

**संदर्भ : १. मोटार वाहन कायदा, १९८८ चे कलम ११५.**
**२. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड यांचे पत्र क्रं./४१२८ दि.१७.०८.२०२६.**

**विषय :- कंधार तालुक्यातील कंधार बहादरपुरा - दिग्रस - जांब - जळकोट राज्य मार्ग क्र.२५० वरील मन्याड नदीवरील बहादरपुरा गावाजवळील मोठ्या पुलावरील वाहतुक पुर्णतः बंद करणे बाबत.**

**दिनांक : १९/०८/२०२६**

**अधिसूचना**

**जा.क्र.२०२६/आरबी-१/डेस्क-२/टे-५(१)/रो.डाय./मन्याड नदी/प्र.क्र.४७.-** – ज्याअर्थी, कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड यांचे पत्र जा.क्रं./४१२८ दि.१७.०८.२०२६ अन्वये राष्ट्रीय महामार्गाचा बहादरपुरा येथील रस्ता व पुल याचे बांधकाम न झाल्यामुळे या राष्ट्रीय महामार्गावरील वाहतुक ही बहादरपुरा येथील मन्याड नदीवर बांधण्यात आलेल्या जुन्या पुलावरुन तात्पुरत्या स्वरुपात जात आहे. ऑगस्ट महिण्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे पुलावरुन १० फुट उंचीवरुन सलग २ दिवस पाणी वाहून गेले आहे. त्यामुळे पुलाची रेलींग ही अत्यंत कमकुवत झालेली आहे व अनेक ठिकाणी तुटलेली आहे. रेलींग उंची ही सुरक्षीततेच्या दृष्टीकोनातून कमी आहे. सदरील पुल बारुळ बॅक वाटरमध्ये येत असल्याने सदर पुलाच्या पात्रामध्ये बाराही महिने पाण्याची पातळी अधिक असते. त्यामुळे पुलाची तपासणी व्यवस्थितपणे करता येत नाही. आजमितीस पुलाच्या ठिकाणी १० ते १२ मीटर पाणी आहे. पुलावर दि.१२/०८/२०२६ रोजी भेट दिली असता प्रथमदर्शनी पुलाच्या पिअर/सपोर्टच्या परिसरात क्रॅकीटमध्ये तडे आढळून आले असुन डेक स्लॅबचे तसेच पियरचे कॉक्रीटचे कव्हर निघून कॉक्रीटचे तुकडे झाल्याचे तसेच लोखंडी सळ्या उघड झाल्याचे निदर्शनास आले आहे. तसेच पुलाच्या बेअरिंगची स्थिती अत्यंत खराब असून बेअरिंग पूर्णतः खराब / नादुरुस्त झाल्याचे निदर्शनास आले आहे. सद्यःस्थितीस मानसपुरी ते फूलवळ या गावा दरम्यान चे राष्ट्रीय महामार्गाचे काम (पुल व रस्ता) अद्याप पर्यंत हाती घेण्यात आले नाही. सदरील पुल व रस्ता बांधकाम जोपर्यंत होणार नाही, तोपर्यंत रस्त्यावरील वाहतूक ही बहादरपुरा गावामधून व गावाजवळील सा.बां.विभाग यांच्या अखत्यारीत असलेल्या पुलावरुन होत आहे. सदरील महामार्गावरुन नांदेड कडून लातुर-जांब-जळकोट-उदगीर व पुढे कर्नाटकाकडे जाणारे जड वाहनांची मोठ्या प्रमाणात वाहतूक होत आहे.

अस्तित्वातील पुलाचे बांधकाम होवुन ५२ वर्षे इतका कालावधी झाला असुन पुलाची कमी असलेली रुंदी, मोठ्या प्रमाणात वाढलेली जड वाहतुक, वेळोवेळी झालेली अतिवृष्टी व वर नमुद केलेल्या कारणामुळे सदरील पुल हा वाहतुकीस धोकादायक झाला आहे. त्यामुळे पुलाचे सक्षम संस्था यांचकडून संरचनात्मक परीक्षण करुन अहवालानुसार उपाययोजना करणे आवश्यक आहे.

वरील स्थिती पहाता या पुलावरील सर्व वाहतुक कंधार घोडज मार्गे फुलवळ अशी पर्यायी मार्गाने वळती करण्याचे जाहीर प्रगटन काढणे आवश्यक आहे. करिता सदरील पुलावरील वाहतूक बंद करण्याची परवानगी द्यावी अशी विनंती केली आहे.

उक्त प्रमाणे कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग नांदेड यांनी प्रस्तावीत केल्याप्रमाणे अपघाताची शक्यता असल्यामुळे पुलावरुन सर्व वाहनाची वाहतुक बंद करणे संयुक्तिक राहील. दरम्यानच्या कालावधीमध्ये वाहतुक कंधार घोडज मार्गे फुलवळ अशी खालील प्रमाणे वळविणे आवश्यक आहे.

| सर्व वाहनांच्या वाहतुकीसाठी प्रतिबंध करावयाचा मार्ग | पर्यायी मार्ग |
|---|---|
| मन्याड नदीवरील बहादरपुरा पुल रस्ता ते बिजेवाडी फाटा | कंधार – घोडज मार्गे फुलवळ |

त्या अर्थी मी राहुल कर्डिले (भा.प्र.से.) जिल्हा दंडाधिकारी नांदेड, मोटार वाहन कायदा १९९९ चे कलम ११५ मधील तरतुदीनुसार मला प्रदान अधिकारान्वये संबंधीत विभागाने खालील उपाय योजना करुन राज्य महामार्ग २५० मन्याड नदीवरील बहादरपुरा पुल रस्ता ते बिजेवाडी फाटा हा मार्ग सर्व वाहनाच्या वाहतुकीसाठी बंद राहील, यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच वर नमुद केलेल्या कंधार-घोडज मार्गे फुलवळ या पर्यायी मार्गाने वाहने वळविण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**उपाय योजना -**

१. पोलीस अधिक्षक, नांदेड यांनी कायदा व सुव्यवस्थेच्या अनुषंगाने आवश्यक ती उपाय योजना करावी.

२. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड यांनी रस्ता वाहतुक प्रतिबंध व पर्यायी रस्त्यासाठी आवश्यक असलेले बोर्ड, चिन्ह लावणे इत्यादी बाबतची कार्यवाही करावी.

३. सदरील मार्ग एक महिण्याचे कालावधीपेक्षा जास्त काळासाठी बंद राहणार असल्याने कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड यांनी सदरील अधिसुचना राजपत्रात प्रसिध्द करुन तसा अनुपालन अहवाल सादर करावा.

उक्त अधिसुचना आज दिनांक १९/०८/२०२६ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी पारित करण्यात आली आहे.

**जिल्हाधिकारी, नांदेड.**

७

**उपविभागीय अधिकारी तथा भुसंपादन अधिकारी, सेलू, यांजकडून**

**नविन भुसंपादन कायदा २०१३ च्या कलम ११ (१) खालील अधिसुचना**

**(भुमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम - २०१३)**

**मौ. हनवतखेडा गाव तलाव ता. जिंतुर जि. परभणी नवीन भुसंपादन कायदा २०१३ अन्वये भुसंपादन**

**दिनांक १३/०७/२०२६**

**क्र. २०२६/उप.वि.अ.का/भुसंपादन./कावी- .**– ज्याअर्थी, भुमीसंपादन पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम - २०१३ (२०१३ चा ३०) याच्या कलम ३ च्या खंड (ई) परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन काढण्यात आलेली अधिसूचना, महसूल व वन विभाग **क्र.संकीर्ण ११/२०१४/प्र.क्र.७७/अ-२, दिनांक १९ जानेवारी, २०१५** (यात पुढे जिचा निर्देश उक्त अधिसूचना असा करण्यात आला आहे.) याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, उक्त अधिनियमाच्या **कलम (३) च्या खंड (झेड अे)** मध्ये व्याख्या केलेल्या एखाद्या सार्वजनिक प्रयोजनासाठी, एखाद्या जिल्ह्यातील **५०० हेक्टर** पेक्षा अधिक नसेल इतक्या क्षेत्राकरीता जमीन संपादन करण्याच्या संबंधात, अशा जिल्ह्याचा जिल्हाधिकारी हा उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी समुचित शासन असल्याचे मानण्यात येईल.

आणि ज्याअर्थी उक्त अधिसूचनेनुसार समुचित शासन असलेल्या, परभणी जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यास यासोबत जोडलेल्या **अनुसूची एक** मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेली जमीन (यात यापुढे जिचा निर्देश उक्त जमीन असा करण्यात आलेला आहे.) सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यक आहे, अथवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे असे वाटते. ज्याच्या स्वरुपाचे विवरण या सोबत जोडलेल्या **अनुसूची दोन** मध्ये दिलेले आहे. आणि म्हणून उक्त अधिनियमाचे **कलम ११ च्या पोटकलम (१)** च्या तरतुदीन्वये याद्वारे असे अधिसूचीत करण्यात येते की, उक्त जमीनीची उक्त सार्वजनीक प्रयोजनासाठी आवश्यकता भासण्याची शक्यता आहे, असे या द्वारे घोषीत करण्यात येते.

आणि ज्याअर्थी प्रस्तावीत भूमी संपादनाच्या अनुषंगाने बाधीत व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पडणारी कारणे, यासोबत जोडलेल्या **अनुसूची तीन** मध्ये दिलेली आहेत. (विस्थापन होणार असेल तर या अनुसूची मध्ये कारणे नमूद करावीत).

आणि ज्याअर्थी, सामाजिक परिणाम निर्धारण सारांश या सोबत जोडलेल्या **अनुसूची चार** मध्ये दिलेली आहे.

आणि ज्या अर्थी, **कलम ४३ च्या पोट कलम (१)** अन्वये पुनर्वसन व पुनर्वसाहत या प्रयोजनासाठी नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशिल, या सोबत जोडलेल्या **अनुसूची पाच** मध्ये दिलेला आहे. (नियुक्ती करणे आवश्यक असेल तर, या अनुसूचीमध्ये तपशिल नमूद करावा.)

त्याअर्थी आता, असे घोषित करतो की, उक्त अधिनियमाच्या कलम-११ च्या पोट कलम ४ नुसार कोणतीही व्यक्ती, ही अधिसूचना प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून ते उक्त अधिनियमाच्या प्रकरण चार खालील कार्यवाही पूर्ण होईल त्या कालावधी पर्यंत उक्त जमीनीचा अथवा तिच्या भागाचा कोणताही व्यवहार करणार नाही, किंवा उक्त जमिनीवर कोणताही भार निर्माण करणार नाही.

परंतू उक्त जमिनीच्या अथवा तिच्या भागाच्या मालकाने अर्ज केल्यावर जिल्हाधिकाऱ्यास विशेष परिस्थितीची कारणे लेखी नमूद करुन अशा मालकास उपरोक्त तरतुदीच्या प्रवर्तनातून सूट देता येईल.

परंतू आणखी असे की, जर कोणत्याही व्यक्तीने या तरतुदीचे बुध्दीपरस्पर उल्लंघन केल्यामुळे तिला झालेल्या कोणत्याही हानीची किंवा क्षतीची जिल्हाधिकाऱ्यांकडून भरपाई दिल्या जाणार नाही.

तसेच उक्त अधिनियमाच्या **कलम -११ च्या पोट कलम (५)** अनुसार, जिल्हाधिकारी भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम -२०१४ (यात पुढे ज्यांचा उक्त नियम असा करण्यात आला आहे.) त्यांचा **नियम-१० च्या उपनियम (३)** द्वारे विहित केल्याप्रमाणे भूमी अभिलेख्याच्या अद्यावतीकरणाचे काम हाती घेणार असल्याचे व पूर्ण करणार असल्याचे देखील घोषीत करण्यात येत आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या **कलम ३ च्या खंड (छ)** अन्वये समुचित शासन असलेल्या जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमाखालील जिल्हाधिकाऱ्यांची कार्ये पार पाडण्यासाठी **उपविभागीय अधिकारी तथा भुंसपादन अधिकारी, सेलू** यांना पदनिर्देशित केलेले आहे.

**अनुसूची एक**

**संपादीत करावयाच्या जमिनीचे वर्णन**

**मौ. मौ. हनवतखेडा ता. जिंतूर जि. परभणी**

**गावतलावसाठी भुसंपादन**

| अ. क्र. | नाव | गट नं./ स.नं. | संपादीत क्षेत्र हे. आर | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | देवकाबाई संजय चव्हाण | १११ | ०.१७ | - |
| २ | संजय कोंडीराम चव्हाण<br>महादु कोंडीराम चव्हाण | ११२ | ०.२० | |
| ३ | प्रभू रुपचंद राठोड | ११३ | ०.३७ | |
| ४ | रामा रुपचंद राठोड | ११३ | ०.२९ | |
| ५ | प्रभू रुपचंद राठोड | ११४ | ०.३१ | |
| ६ | रामा रुपचंद राठोड | ११४ | ०.३१ | |
| ७ | सठवा संभा निकाळजे | ११५ | ०.२९ | |
| ८ | बालु बन्सी वाकळे | ११५ | ०.५९ | |

| अ. क्र. | नाव | गट नं./ स.नं. | संपादीत क्षेत्र हे. आर | शेरा |
|---|---|---|---|---|
| ९ | बन्सी परबाता वकाळे | ११५ | ०.४० | |
| १० | लहू प्रेमसिंग राठोड<br>शेषेराव गोबरा राठोड | ११६ | ०.६३ | |
| ११ | पंडीत लालसिंग राठोड<br>तारासिंग धारु राठोड | ११६ | ०.४३ | |
| १२ | शेषेराव गोबरा राठोड | ११६ | ०.०७ | |
| १३ | तारासिंग धारु राठोड | ११६ | ०.११ | |
| १४ | लहू प्रेमसिंग राठोड<br>शेषेराव गोबरा राठोड | ११६ | ०.११ | |
| १५ | लहू प्रेमसिंग राठोड<br>शेषेराव गोबरा राठोड | ११६ | ०.११ | |
| १६ | शेषेराव गोबरा राठोड | ११६ | ०.१५ | |
| १७ | भगवान उध्दव पजई | ११६ | ०.११ | |
| १८ | लहू प्रेमसिंग राठोड<br>शेषेराव गोबरा राठोड | ११६ | ०.०४ | |
| १९ | सखाराम धोंडीबा आवचार<br>शेषराव धोंडीबा आवचार | ११६ | ०.०९ | |
| २० | सखाराम धोंडीबा आवचार<br>शेषराव धोंडीबा आवचार | ११६ | ०.२६ | |
| २१ | सखाराम धोंडीबा आवचार<br>शेषराव धोंडीबा आवचार | ९८ | ०.१६ | |
| २२ | लहू प्रेमसिंग राठोड<br>शेषेराव गोबरा राठोड | ९८ | ०.१५ | |
| २३ | बापुराव तारासिंग राठोड | ९८ | ०.०६ | |

**अनुसूची - दोन**

**सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरुपाबाबत विवरण**

**प्रकल्पाचे नांव :-** रोहयो अंतर्गत मौ. हनवतखेडा गावतलाव करण्यासाठी भुसंपादन

**प्रकल्प कार्याचे वर्णन :-** गावतलाव करण्यासाठी भुसंपादन सार्वजनीक कामाचे प्रयोजनार्थ

**समाजाला मिळणारे लाभ :-** शेतीपीकासाठी पाणी, जनावरांना पाणी व इतर सार्वजनिक हितार्थ,

**अनुसूची - तीन**

**बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे -**

विस्थापनाची आवश्यकता नाही सबब माहिती - निरंक

**अनुसूची चार**

**(पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश)**

**(सामाजिक प्रभाव निर्धारण अभ्यास करणाऱ्या अभिकरणाने दिलेल्या)**

**सामाजिक प्रभाव निर्धारण सारांश -** दिनांक १३ मार्च २०१५ चे राजपत्रात प्रसिध्द महाराष्ट्र शासनाची अधिसुचना क्रमांक संकीर्ण ०१/२०१५/प्र.क्र.३/अ-२ नुसार उक्त अधिनियमाचे कलम -१० क नुसार सामाजिक प्रभाव निर्धारणाच्या तरतुदी लागू करण्यापासून सुट देण्यात आलेली आहे.

**अनुसूची पाच**

**नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील**

**अ) प्रशासक म्हणून नियुक्त करण्यात आलेल्या अधिकाऱ्याचे पदनाम -** - प्रशासक नियुक्तीची आवश्यकता नाही.

**ब) प्रशासकाच्या कार्यालयाचा पत्ता :-** निरंक

**क) ज्या अधिसुचनेद्वारे प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली आहे त्या अधिसुचनेचा तपशील :-** निरंक

**टीप :-** उक्त जमिनीच्या आराखड्याचे **उपविभागीय अधिकारी तथा भुसंपादन अधिकारी, सेलू** यांचे कार्यालयामध्ये निरीक्षण करता येईल.

**दिनांकः १३/०८/२०२६**

ठिकाणः सेलू

/-

उपविभागीय अधिकारी तथा
भुसंपादन अधिकारी, सेलू.

---

८

**जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नांदेड, यांजकडून**

**अधिसूचना**

**जा. क्र. कक्ष-८/पतसंस्था/भगवान श्री. चक्रधर स्वामी ग्रामीण/नोंदणी/२२६७/२०२६/ दिनांक :- १३ जुलै, २०२६ :-** जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नांदेड हे यापत्राद्वारे अधिसूचित करीत आहेत की, भगवान श्री. चक्रधर स्वामी ग्रामीण सहकारी पतसंस्था मर्या., नांदेड ता.जि. नांदेड ही संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ९ (१) अन्वये नोंदविण्यात आली असून जिचा नोंदणी एनएनडी/आरएसआर/(ओ)/८३३/२०२६ दिनांक :- १३ जुलै, २०२६ असा आहे.

उक्त अधिनियमाचे कलम १२ (१) आणि महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६२ चे नियम १० (१) अन्वये जिचे वर्गीकरण **"साधन संपत्ती संस्था"** उपवर्गीकरण **"कर्ज देणाऱ्या साधन संपत्ती संस्था"** असे करण्यात आलेले आहे.

(शाहूराज हिरे)
**जिल्हा उपनिबंधक**
**सहकारी संस्था, नांदेड.**

---

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR SMT. MANISHA KUMBHAR, PRINTED AT GOVERNMENT PRESS, PAITHAN ROAD, CHHATRAPATI SAMBHAJINAGAR-431 005 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI-400 004. EDITOR : DIRECTOR. SMT. MANISHA KUMBHAR

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## प्राधिकृत प्रकाशन

वर्ष १२ वे, राजपत्र क्र. १७] गुरुवार ते बुधवार, सप्टेंबर १०-१६, २०२६ : भाद्रपद १९-२५, शके १९४८ [किंमत : ०.०० रुपये

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.


## भाग एक–अ-छत्रपती संभाजीनगर विभागीय पुरवणी

**(भाग चार-ब मध्ये प्रसिध्द करण्यात आलेले आहेत त्याव्यतिरिक्त केवळ छत्रपती संभाजीनगर विभागाशी संबंधित असलेले व महाराष्ट्र नगरपालिका, जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपरिषदा, जिल्हा नगरपरिषदा, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम या अन्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना)**

**टीप :–प्रत्येक अधिसूचनेच्या आधी मधोमध जे ठळक आकडे छापलेले आहेत ते ह्या साप्ताहिक राजपत्रात छापलेल्या अधिसूचनांचे अनुक्रमांक आहेत.**

**१**

**मुख्याधिकारी नगर परिषद, लोहा यांजकडून**

**आदेश**

**जा.क्र. न.प.लो./२१२०/२०२६ दिनांक.०५/०३/२०२६** ज्याअर्थी महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण भाग-चार दि. १३ मार्च २०१२ मध्ये प्रसिद्ध केल्यानुसार सण २०१३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २ अन्वये महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ मध्ये दुरुस्ती करण्यात आलेली आहे.

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम १५२ मध्ये महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ५५ आणि ५६ मधील तरतुदींच्या अंमलबजावणीसाठी व अनाधिकृत बांधकामावर प्रभावी नियंत्रण आणणेसाठी मुख्याधिकारी यांनी नगरपरिषदेच्या बाबतीत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम १५२ (३) नुसार संबंधित अधिकारीयास त्याच कार्यक्षेत्राकरिता "पदनिर्देशित अधिकारी" म्हणून अधिसूचित करणेची तरतूद करण्यात आलेली आहे.

त्याअर्थी, आता, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम १५२ (३) मधील तरतुदीनुसार नगरपरिषद मुख्याधिकारी म्हणून मला प्राप्त झालेल्या अधिकारात मी, लोहा नगरपरिषदेच्या कार्यक्षेत्रासाठी लोहा नगरपरिषदेत कार्यरत असलेले कर्मचारी यांची खालील नमूद तक्त्यातील तपशीलाप्रमाणे अनधिकृत बांधकामावर प्रभावी नियंत्रण आणण्यासाठी व अधिनियमातील कलम ५५ व ५६ मधील तरतुदींच्या अंमलबजावणीसाठी "पदनिर्देशित अधिकारी" म्हणून घोषित करीत आहे.

**परिशिष्ट**

| अनु.क्र. | अधिकारी /कर्मचारी यांचे नाव | सोपवण्यात आलेले कार्यक्षेत्र (२०२५ च्या निवडणूक वॉर्ड रचनेप्रमाणे) |
|---|---|---|
| १ | श्री. नीलेश माधव चव्हाण | ०१ |
| २ | श्री. अविनाश विजय महाबळे. | ०३ |
| ३ | श्री. गजानन किशन दांगटे. | ०७,०८ |
| ४ | श्री. नरेंद्र चादू गायकवाड. | ०४,०५ |
| ५ | श्री. नंदू माधव दाढेल. | ०२ |
| ६ | श्री. सतीश कोंडीबा गालफाडे. | ०६ |
| ७ | श्री. सोमनाथ सदाशिव केंद्रे | ०९,१० |

वेळोवेळी मुख्याधिकारी यांनी निर्गमित केलेल्या विवक्षित आदेशामध्ये नमूद केलेल्या कार्यक्षेत्रासाठी उपरोक्त १ ते ७ अधिकारी/कर्मचारी यांचे नियुक्तीच्या कालावधीत या अधिसूचनेनुसार "पदनिर्देशित अधिकारी" समजण्यात येईल.

ठाणे महानगरपालिका हद्दीत शिळफाटा येथे अनधिकृत बांधकाम केलेली सात मजली इमारत ढासळून अनेक लोकांना आपले प्राण गमवावे लागले असून, अशा घटना इतर ठिकाणी होऊ नयेत, याची दक्षता घेणे आवश्यक आहे.

त्या अनुषंगाने अशी अनधिकृत विकास/बांधकाम व त्यावर करावयाची कार्यवाही खाली विशद केल्याप्रमाणे आहे.

१. आतापर्यंत प्राप्त झालेल्या सर्व अनधिकृत विकास/बांधकामविषयक तक्रारीची स्थळ पाहणी करुन पंचनामा करणे व नोटीस देऊन पुढील नियमोचित तक्रार दाखल करणे.

२. घेतलेल्या बांधकाम परवानगीशी सुसंगत नसलेली किंवा परवानगी देतांना घेतलेल्या अटींचा भंग करुन केलेली विकास कामे अथवा बांधकाम संदर्भात उचित कार्यवाही करणे.

३. मंजूर FSI निर्देशांकापेक्षा जादा केलेला विकास / बांधकामसंदर्भात अधिनियमातील तरतुदीनुसार कारवाई प्रस्तावित करणे.

४. परवानगीचा कालावधी संपल्यानंतर केलेला विकास / बांधकामसंदर्भात अधिनियमातील तरतुदीनुसार कार्यवाही प्रस्तावित करणे.

५. परवानगीच्या विरोधात जाऊन केलेले विकास काम जसे जमिनीच्या वापरात विनापरवानगी बदल इत्यादी बाबत अधिनियमातील तरतुदीनुसार कारवाई प्रस्तावित करणे.

उक्त बांधकामांना अनधिकृत विकास/बांधकाम समजण्यात यावे व त्यावर पुढीलप्रमाणे कार्यवाही करावी.

(१) विकास / बांधकाम याची स्थळ पाहणी करुन पंचनामा करणे.

(२) महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ अन्वये योग्य त्या करुन प्रणाली नोटिस देणे.

(३) अशा बांधकामास जबाबदार असणाऱ्या व्यक्तीवर खटला भरणे / दाखल करणे. (अधिनियमातील तरतुदीन्वये योग्य त्या प्राधिकरणाकडे तक्रार दाखल करणे.)

(४) कोणत्याही इमारतीचे उभारणीचे काम, विकास अथवा बांधकाम उक्त अधिनियमांच्या किंवा उपविधीच्या तरतुदीचा भंग करीत असल्याचे "पदनिर्देशित अधिकारी" निदर्शनास आणून दिले असेल आणि जर असा "पदनिर्देशित अधिकारी" पुरेशा कारणाशिवाय, नगररचना अधिनियम, १९६६, मधील कलम ५२, ५३, ५४, ५५ किंवा ५६ वा इतर आवश्यक त्या तरतुदीप्रमाणे कार्यवाही करण्यास कसूर करीत असेल तर त्याचेवर नियमानुसार कारवाई प्रस्तावित करण्यात येईल. याशिवाय अधिकारी / कर्मचारी यांचे निष्काळजीपणा मुळे काही अपघात घडल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी त्या कर्मचारी अधिकारी यांचेवर निश्चित करण्यात येईल.

६. वरील नियुक्त अधिकारी / सेवक यांनी वरीलप्रमाणे कार्यवाही करण्यापूर्वी रचना सहायक, सहायक नगररचनाकार यांचे मार्गदर्शन घेऊनच कार्यवाही करावयाची असून, रचना सहायक/ सहायक नगररचनाकार यांनी सर्व नियुक्त पदनिर्देशित अधिकारी यांचा अहवाल संकलीत करुन घेऊन मा. मुख्याधिकारी यांच्याकडे सादर करावयाचा आहे.

**श्रीकांत अण्णासाहेब लाळगे**
**मुख्याधिकारी, नगरपरिषद, लोहा.**

---

२

**मुख्याधिकारी, नगर परिषद वसमत जि. हिंगोली यांजकडून**

**अधिसूचना**

**(महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये किरकोळ फेरबदल)**

ज्याअर्थी नगर परिषदेचे दिनांक ३१/०७/२०२६ चे विशेष सभेतील ठराव क्र. ३ अन्वये वसमत शहराचे विकास योजनेमध्ये किरकोळ फेरबदल करण्याने निश्चित झाले आहे. ज्याअर्थी महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ नुसार विकास योजने मध्ये किरकोळ फेंरबदल करण्याकरीता आवश्यक कार्यवाही करण्याचे सर्व अधिकार मुख्याधिकारी, नगर परिषद वसमत यांना प्रदान केले आहे.

त्याअर्थी मी आशुतोष चिंचाळकर, मुख्याधिकारी, नगर परिषद वसमत जि. हिंगोली खालील प्रमाणे आदेश काढीत आहे.

**अधिसुचना**

(महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ नुसार विकास योजने मध्ये फेरबदल)

**जा. क्र. कावी/रचना वि/३५१५/२०२६.–** महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास विभागाचे शासन निर्णय क्र. टिपीएस-३१२३/७८२/प्र.क्र.१२० वि.यो. भागशा मंजुरी/२०२३/नवि-३०, अन्वये दि. ०३/०७२०२५ अन्वये वसमत शहराची विकास योजना मंजूर केलेली असून ती ०३ जुलै २०२५ पासून अंमलात आली आहे.

वसमत नगर परिषदेने महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ तरतुदी नुसार खालील दर्शविल्या प्रमाणे विकास योजने मध्ये फेरबदल करण्याचे ठरविले आहे.

वसमत नगर परिषद हद्दीतील स.नं. १४७ मधील क्षेत्रफळ ०.४० हेक्टर आर वसमत शहराचे मंजूर विकास योजनेच्या नकाशामध्ये सदर जागा साठवणूक गोदाम करीता क्षेत्र दर्शविलेली आहे.

वसमत नगर परिषद हद्दीतील शेत स.नं. १४७ मधील क्षेत्रफळ ०.४० हेक्टर आर वसमत शहर विकास आराखडयामध्ये "साठवणूक गोदाम" करीता साठवणूक गोदाम क्षेत्रातून वगळून "प्रशासकीय इमारत" या कामाकरीता वापरात घेणे यामध्ये समाविष्ट करण्यात येणार आहे.

वरील फेरबदल दर्शविणारा नकाशा नगर परिषद कार्यालयात कार्यालयीन वेळेत नागरीकांना अवलोकन करण्या करिता ठेवला आहे.

वरील फेरबदला बाबत नागरीकांना तक्रारी अथवा सुचना दाखल करावयाची असल्यास सदर अधिसुचना महाराष्ट्र शासनाचे राजपत्रात प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाचे आत मुख्याधिकारी नगर परिषद वसमत यांचेकडे पाठवाव्यात. शासनाकडे वरील फेरबदलाचा प्रस्ताव पाठविण्यापुर्वी आलेल्या तक्रारी किंवा सुचना यांचा फेरबदला बाबत विचार केला जाईल. विहीत मुदतीनंतर आलेल्या सुचना किंवा हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत.

**ठिकाण :- वसमतनगर**

**दिनांक :- ०४/०९/२०२६**

**(आशुतोष चिंचाळकर)**
**मुख्याधिकारी**
**नगर परिषद वसमत**

**By Chief Officer of Muncipal Council Basmat Nagar Dist. Hingoli**

For minor modification in Development Plan of Basmat Nagar under section 37 of Maharashtra Regional and Town Planning Act. 1966

**NOTIFICATION**

जा. क्र. कावी/रचनावि/३५१५/२०२६.- The Development Plan of Basmat Nagar Town has been sanctioned by Maharashtra Government vide resolution No. TPS-3123/782/CR-120/2023/EP Publish/UD-30 Ministry of Urban Development Department, Mumbai Dated 03rd July 2025 and came in to force since 03rd July 2025.

Basmat Nagar Muncipal Council vide its General Body meeting resolution No. 3 Dated 31/07/2026 has decided to make minor modification. The description of the proposed modification is as under.

**MINOR MODIFICATION**

The land under Sr.No. 147 Area measuring 0.40 Hect. is reserved for Storage Godown sanctioned Development plan of Basmat Nagar Town.

The said part of Sr.No. 147 Area measuring 0.40 Hect. reserved for Storage Godown may be excluded from Storage Godown and shall be included in the use for Government Office.

The part plans showing above minor modification is made available at Municipal Council, Basmat Nagar Office for inspection of Public during office hourse. The objection and suggestions in respect of above modification received in writing within 30 days from the date of publication of this notification in the Government Gazette shall be heard before its submission to the Government. The objection and suggestions raised later will not be considered.

Location - Basmat Nager

Date :- 04/09/2026

**(Aashutosh Chinchalkar)**
Chief Officer
Muncipal Council Basmat Nagar

----------------

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR SMT. MANISHA KUMBHAR, PRINTED AT GOVERNMENT PRESS, PAITHAN ROAD, CHHATRAPATI SAMBHAJINAGAR-431 005 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI-400 004. EDITOR : DIRECTOR. SMT. MANISHA KUMBHAR